


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२२, शुक्रवार, १७ मे २०२३ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# नगर दक्षिणेचा कल लंके यांच्याकडे झुकणारा !

## ज्येष्ठ पत्रकार रामदास ढमाले यांची मटा.ला मुलाखत



**नगर : प्रतिनिधी**

गेल्या निवडणूकांचा आढावा घेउन अंदाज बांधला तर ही निवडणूक विखे यांना जड गेली आहे. तर लंके यांना अनपेक्षितपणे धक्के देणारी आहे. या निवडणूकीचा कल लंके यांच्याकडे झुकणारा दिसतो. त्याची कारणे अत्यंत्य सुस्पष्ट असल्याचे ज्येष्ठ पत्रकार रामदास ढमाले यांनी मटा ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सांगितले.

ढमाले म्हणाले, या निवडकीला एक वेगळा व कधी न घडलेला संदर्भ आहे. मुस्लिम, ख्रिश्चन समाजाची काहीही न करता एक गठठा मते सत्तारूढ भाजपाच्या विरोधात गेलेली आहेत. अहिल्यानगरच्या नामांतराप्रसंगी खा. डॉ. सुजय विखे यांनी सुरूवातीस जी प्रतिक्रीया दिली होती. त्यावर वाद झाला, त्या वादातून धनगर समाजाचा बेल भंडार उधळीपर्यंत प्रकार घडला. धनगर समाजाची मतेही विखे यांच्यापासून बाजूला गेली. अशी एकूण दोन ते अडीच लाख बोनस मते लंके यांच्याकडे गेली असल्याचे ढमाले म्हणाले.

ढमाले पुढे म्हणाले, बोनस मतांचा विचार करून निवडणूकीमध्ये झालेले मतदान एकूण १३ लाख असून अडीच लाख मतांचे मताधिक्य घेण्यासाठी विखे यांना अडीच लाख मते घ्यावी लागतील. असे पाच लाख वजा करून सात ते आठ लाख मतांची ही निवडणूक आहे. सात ते आठ लाखांमध्ये मतदारसंघनिहाय कोण कशी मते घेणार हे पाहणे महत्वाचे असल्याचे ढमाले यांनी स्पष्ट केले.

काही संदर्भ विचारात घेतले तर या मतदारसंघात बाळासाहेब विखे यांनी निवडणूक लढविली त्यावेळी त्यांन या मतदारसंघात ज्या पायाभुत सुविधा उपलब्ध केल्या होत्या त्याचा फायदा सन २०१९ च्या निवडणूकीत डॉ. सुजय विखे यांना जरूर झाला. गेल्या पाच वर्षात बाळासाहेब विखे यांची जी रणनिती होती ती भाजपामध्ये चालली नाही म्हणा, किंवा विखे पिता पुत्रांनी ती चालविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे विखे यांच्या बाजूची मतेही त्यांच्यासोबत राहिली नाहीत असे ढमाले यांनी सांगितले.

### शेवगांव-पाथर्डीत माधव फॅक्टर बिनसला

*शेवगांव पाथर्डीमध्ये जातीय समिकरणे अर्थात माधव फॅक्टर जुळविण्याचा जो प्रयत्न करायला हवा होता तोच मुळात बिनसलेला आहे. लंकेंसाठी या मतदारसंघात कोणी आमदार नाही किंवा प्रताप ढाकणे सोडता मोठा पुढारीही नाही. असे असताना लंके यांच्या सभेला जी गर्दी होते. लंके यांच्या संवाद यात्रेला जनतेने जो प्रतिसाद दिला तो लक्षात घेतला तर या मतदारसंघात विखे यांना मताधिक्य मिळेल असे म्हणणे फारसे संयुक्तीक ठरणार नाही. शेवगांव-पाथर्डीमधील मतदार राजकीय दृष्टया विद्रोही आहेत. त्यांना जे भावते ते लोंढयाने त्या दिशेने जातात. हा इतिहास आहे. मारूतराव घुले या दिग्गज उमेदवाराला तुकाराम गडाख या सामान्य उमेदवाराने पराभूत केले होते. पाथर्डीतही बबनराव ढाकणे या सामान्य तरूणाला कॉंग्रेसविरोधात निवडून देणारा पाथर्डी तालुका आहे.*

### आरक्षणाचा फटका बसणार

*आरक्षणाचा जो मुददा आहे फारसा प्रभावी ठरला नाही. नरेंद्र मोदी यांनी बीडमध्ये ओबीसी, आदीवासी समाजाबाबत आदीवासी समाजामध्ये आम्ही कोणाला घुसू देणार नाही हे वक्तव्य केले. धनगर समाजाची मागणी आहे त्यांना जो दर्जा हवा आहे तो मिळणार नाही हे मोदी यांनी ठोकून सांगितले. त्यानंतर धनगर समाज बाजूला होण्याची प्रक्रिया जोरात सुरू झाली. दोन्ही उमेदवार मराठा आहेत. मराठा समाजाला कमी आरक्षण मिळाले. सगे सोयरे हा जो मुददा आहे. तो सुटलेला नसल्याने सतारूढ पार्टीला पर्यायाने विखे यांना त्याचा फटका बसेल.*

### कर्जत-जामखेड सत्ताधाऱ्यांविरोधात

*कर्जत जामखेडमध्ये सत्तारूढ पार्टीच्या विरोधात मतदान करण्याची परंपरा गेल्या तीस चाळीस वर्षात निर्माण झाली आहे. कॉंग्रेस सत्तेवर असताना भाजपाचा आमदार, ज्यावेळी भाजपा सत्तेत होती त्यावेळी राष्ट्रवादीचा आमदार विजयी होतो. सत्तेच्या विरोधात राहणारा हा मतदारसंघ आहे. तो यावेळीही सत्तेच्या विरोधात जाउ शकतो.*

### पारनेरमध्ये लंके यांचीच सरशी

*पारनेर हा असा तालुका आहे जीथे बाळासाहेब विखे व विखे कुटूंबाने अतिशय चांगली बांधणी केलेली होती. अशा स्थितीत विखे यांना पारनेरात मताधिक्य मिळविणे शक्य होते. मात्र विखे यांनी सत्तेतील माणसं, मातब्बर नेते सोबत घेतली. माजी आमदार विजय औटी यांनाही बरोबर घेतले. त्यांना बरोबर घेण्याचा फायदा होण्याऐवजी त्याचा किमान तोटा होउ शकतो. सन १९५२ पासूनचा इतिहास तपासला तर आतापर्यंत पारनेरचा एकही खासदार झालेला नाही. आपल्या तालुक्यातील खासदार होत असेल लोकांना तो पाहिजे. तो चांगला किंवा वाईट याचा विचार मतदार करणार नाहीत. तो काय काम करणार आहे याचाही मतदार विचार करणार नाही. त्यामुळे पारनेरमध्ये लंके यांची सरशी होणारच आहे. ही सरशी विखे हे थांबवू शकत होते मात्र औटी यांना बरोबर घेउन त्यास ब्रेक लागला.*

### श्रीगोंद्यात मतदारांनी निवडणूक हाती घेतली

*श्रीगोंदा हा तालुकाही सत्तेच्या विरोधात जाणारा तालुका आहे. ज्यावेळी भाजपाचे दिलीप गांधी प्रथम उमेदवार होते त्यावेळी सगळी यंत्रणा विरोधात असताना दिलीप गांधी यांना सर्वाधिक मताधिक्य मिळाले. यावेळीही लोकांनी ही निवडणूक हाती घेतली आहे. १९५७ च्या निवडणूकीत कॉंग्रेसने विद्यामान खासदार बोगावत यांना उमेदवारी दिली होती. त्यांच्याविरोधात प्र. के.खाडीलकर हे उमेदवार होते. खाडीलकर हे मजूर पक्षाचे पुण्यातील उमेदवार होते. पक्ष आणि उमेदवार माहीती नसतानाही मतदारांनी त्यांना विजयी केले. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा संदर्भ होता. अशाच पध्दतीने ही निवडणूक श्रीगोंद्यात लोकांनी हाती घेतली. असे प्रकार यापूर्वी जिल्हयात दोन तीन वेळा घडले आहेत. कोपरगांव मतदार संघातही लोकांनी निवडणूक हाती घेत शंकरराव काळे यांचा पराभव करून भिमराव बडदे यांना विजयी केले. आपल्याकडे यंत्रणा आहे म्हणून लोक विजयी करतील हा भ्रम चुकीचा आहे. उमेदवाराकडे काही नसताना भिमराव बडदे, दिलीप गांधी यांना मतदारांनी निवडून दिले. आता तसेच नीलेश लंके यांच्या बाबतीत घडेल असे चित्र आहे.*

### दुरावलेला समाज कसा जुळवणार ?

*पंकजा मुंडे व राम शिंदे यांच्या प्रभावाबाबत पंकजा मुंडे याच स्वतः अडचणीत आहेत. वंजरी समाजाचे मतदान पाथर्डीत आहे. तसेच मराठा समाजाचेही मतदान आहे. वंजारी समाज एकवटला तर मराठा समाजही एकवटला जातो. मराठा आरक्षणाची त्याला झालर आहे. दुसरा मुददा असा की वंजारी समाजाकडे खेडकर हे उमेदवार आहेत. जातनिहाय विचार केला तर ते त्यांना मतदान करू शकतात. राम शिंदे यांना उमेदवारी हवी होती. त्यांनी विखे यांना विरोधही केला होता. शिंदे यांनी विखे यांच्यासाठी पुढाकार घेतला तरी समाज जो दुरावला गेला आहे तो कसा जुळवला जाणार हा मुलभूत प्रश्न आहे. शिंदे हे कितीही प्रमाणिक राहिले तरीही मतदार किती स्विकारणार ? कारण त्यांनी बेलभंडार उचलला आहे. हे लक्षात घ्यावे लागेल.*

### अजित पवार ठरविणारे कोण ?

*लंके यांचे प्रचंड मायनस पॉईंट आहेत. मात्र विखे पाहिजेत की विखे नकोत हा प्रश्न आहे. विखे पाहिजेत ही मते विखेंबरोबर तर विखे नको ही मते लंके यांच्यासोबत आहेत. लंके यांची स्वतंत्र व्होट बँक नाही. शरद पवार यांची सहानुभूती आहे. दोन्ही उमेदवारांकडे तीन आमदार आहेत. अजित पवार यांनी पारनेरमध्ये येऊन याला पाहून घेउ, याला पाडू, याला निवडणून आणू अशी वक्तव्ये केली. हे अजित पवार हे ठरविणारे कोण नगर जिल्हयात ? ते मतदार ठरवतील. विखे यांनी आतापर्यंत पवारांना शिव्या शाप दिले. तेच त्यांच्यावर उपकाराची भाषा करीत असतील ते मतदार स्विकारणार नाहीत. मतदार इतके दुधखुळे नाहीत.*

### जिल्हा विकास आघाडीची मते दुरावली

*विखे हे कॉंग्रेमध्ये असो वा शिवसेनेत. त्यांची जिल्हा विकास आघाडी कार्यरत असे. या आघाडीस पक्षाइतकेच बळ मिळत होते. ही आघाडी या निवडणूकीत कुठेही कार्यरत नव्हती. त्यामुळे या निवडणूकीत विखे यांना फक्त पक्षाच्याच मतांवर अवलंबून रहावे लागले. त्यामुळे महाविकास आघाडीची वजा झालेली मतेही विचारात घ्यावी लागतील असे ढमाले यांनी सांगितले.*

### माफी मागून चुक कबुल केली

*सन १९९१ मध्ये झालेल्या बाळासाहेब विखे विरूध्द यशवंतराव गडाख या निवडणूकीचा आपण ज्यावेळी संदर्भ देतो, त्यावेळी अनेक गोष्टी सुस्पष्ट होउ लागतात. सुजय विखे यांनी सुरूवातीपासून बचावाची भुमीका घेतली. पाहिल्याच बैठकीत डॉ. विखे यांनी माफी मागितली. माफी मागणे म्हणजे आपली चुक कबुल करण्याचा प्रकार आहे. झालेल्या चुका त्यांनी पहिल्यांदाच जाहिररित्या मान्य केले.*

### विखेंना बॅकफुटवर नेणाऱ्या गोष्टी

*पाथर्डी येथे पार पडलेल्या पक्षाच्या बैठकीत मला मते द्यायची नसतील तर मोदींना द्या, मुंडेंना द्या, यापैकी कोणालाही द्यायची नसेल तर तुतारी मारा हे म्हणण्याची वेळ विखे यांच्यावर येते ही अत्यंत दुर्देवी गोष्ट आहे. त्याची नोंद मतदार नक्कीच घेत असतो. विखे यांच्या या गोष्टी त्यांना बॅकफुटवर नेणाऱ्या आहेत. विखे बॅकफुटवर गेल्याचा अंडरकरंट आहे तो मतांमध्ये परीवर्तीत झालेला असतो.*

### लंके यांनी विखेंची फरफट केली

*नीलेश लंके यांनी आरोप करायचे आणि उत्तरे विखे यांनी द्यायची याचा अर्थ या संपूर्ण निवडणूकीत लंके यांनी विखे यांना फरफटत नेले. या फरफटीचा परिणाम कुठे ना कुठे झालेला आहे.*

### मोदींनी विखेंची बोनस मते पक्की केली

*सन २०१९ मध्ये विखे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा घेतली. त्याचा परिणाम चांगला झाला. यावेळच्या मोदी यांच्या सभेचा परिणाम कुठेही जाणवला नाही. मोदी आले ते बोलले. कसाब, मुस्लिम मतदार यांच्यावर ते बोलले. याचा अर्थ लंके यांची बोनस मते मोदी यांनी अधिक पक्की केली.*

### मोदी पवारांवर बोललेच नाहीत

*नगर जिल्हयात शरद पवार यांना सहानुभूती आहे. या सहानुभूतीवर मोदी हे पुण्यात, नंदुरबार, बीड येथे बोलले. नगरमध्ये मात्र ते बोलले नाहीत. विखे व पवार यांचा संघर्ष मोदी यांनाही ठाउक असेल. परंतू ते जाणीवपुर्वक बोललेच नाहीत. त्यामुळे पवार यांची सहानुभूती तशीच राहून त्याचा लंके यांना फायदा झाला.*

### नगर शहरात मताधिक्य देणारा वर्ग दुरावला जाऊ शकतो

*सगे-सोयरे हे काही प्रभावी ठरणारे मुददे नाहीत. मतदारसंघ निहाय विचार केला असता नगर शहरात मागिल निवडणूकीत विखे यांना मताधिक्य होते. ते जगताप कोतकरांविरोधात होते. यावेळी जगताप, कोतकर, कर्डीले हे विखे यांच्यासोबत होते. ज्यांच्या विरोधात मताधिक्य मिळाले ते यावेळी विखे यांच्यासोबत होते. आता मताधिक्य देणारा वर्ग दुरावला जाउ शकतो. ही लढत बरोबरीत सुटेल कींवा कोण मताधिक्य घेईल हे ४ जुन रोजी कळेल.*

### राहुरीच्या मताधिक्क्याबाबत शंका

*राहुरी हा विखे यांचा हक्काचा मतदारसंघ. राहुरी सहकारी साखर कारखाना व इतर प्रश्न तिथे आहेत. कारखाना विखे यांनी चालविण्यासाठी घेतला होता. तो आता बंद आहे. त्यामुळे त्या परीसरातील मते आपसुक विरोधात गेलेली आहेत. राहुरी शहरातील वर्ग महाविकास आघाडी व तनपुरे यांना मानणारा आहे. त्यामुळे मागिल निवडणूकीत विखे यांना जे मताधिक्य मिळाले होते ते यंदा कितपत मिळेल याची शंका आहे.*

## नेवाशात गर्ल्स स्किल डेव्हलपमेंट उपक्रम सुरू

**नेवासा :** ज्येष्ठ साहित्यिक, माजी खा. यशवंतरावजी गडाख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुळा एज्युकेशन सोसायटीने गर्ल्स स्किल डेव्हलपमेंट हा उपक्रम सुरू केला आहे. ताईसाहेब कदम कन्या विद्यालय व शारदाताई फाउंडेशन यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येतं आहे. या उपक्रमांतर्गत शारदाताई फाउंडेशनच्या वतीने ताईसाहेब कदम कन्या विद्यालयातील ३ मुलींना शिलाई मशीन भेट देऊन मुलींसाठी खास प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ युवा नेते उदयन गडाख, माजी सभापती सुनिता गडाख यांच्या हस्ते करण्यात आला.

## श्रीरामपुरात कांदा १६०० रुपये क्विंटल

**श्रीरामपूर :** बाजार समितीत लुज कांद्याची आवक १०३ वाहनांद्वारे झाली असून लूज कांद्याला १८०५ रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळाला आहे. या आठड्यात कांद्याची आवक कमी झाली आहे. या बाजार समितीत कांदा न. एक १२०० ते १६००, कांदा न. दोन ९०० ते १२००, कांदा न. तीन ५०० ते ९०० गोल्टी कांदा १२०० ते १४०० रुपये इतका भाव मिळाला असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
**Saint Vivekanand Public School**
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



# युवा


**लग्नानंतर नवरा बायकोचे एक नवीन आयुष्य सुरू होते. त्यांच्या या नवीन नात्यात प्रेम, गोडवा, आपुलकी, काळजी समजूतदारपणा दिसून येतो. दोघेही एकमेकांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतात. असं म्हणतात, बायकांना समजून घेणे खूप कठीण आहे. अशात बायकोला आनंदी ठेवणे हे नवऱ्यासाठी एक मोठं आव्हान असू शकते. आज आपण लग्नानंतर बायकोला कसं आनंदी ठेवायचं, याविषयी काही टिप्स जाणून घेणार आहोत...**

## नवऱ्यांनो, लग्नानंतर बायकोला ठेवा असं आनंदी...

लग्नानंतर एकमेकांना समजून घेणं हे खूप मोठं आव्हान असतं. जर पत्नी नाराज असेल किंवा रागात असेल तर तुम्ही अशावेळी शांत राहा. तुम्ही काहीही बोलू नका आणि शांतपणे परिस्थिती हाताळा. जर पत्नीने काही चूक केली असेल तर ओरडू नका आणि तिला समजावून सांगा. तिच्याबरोबर खूप प्रेमाने वागा. कधीही तिच्या रागाला किंवा नाराजीला चुकूनही ड्रामा म्हणू नका. नाराजी दूर होईपर्यंत शांत राहा. तिला समजून घेण्याचा प्रयत्न करा. तिचा राग शांत करण्यासाठी तिला प्रेमाने आलिंगन द्या आणि तुम्ही तिच्याबरोबर नेहमी आहात, असा विश्वास तुमच्या



बोलण्यातून दाखवा. पत्नीला ज्या गोष्टी करायला आवडतात, त्या करू द्या. त्यांच्यावर कधीही बंधने लादू नका. लग्नानंतर तिचे आयुष्य पूर्णपणे बदलले आहे, अशी तिला चुकूनही जाणीव होऊ नये. तिचा मनापासून आदर करा.



## ब्रेकअपनंतर लगेच दुसरे प्रेम...

### जरा थांबा, आधी हे वाचा...

**प्रत्येक व्यक्ती कधी ना कधी कुणाच्या तरी प्रेमात पडतो. काही नाती चिरकाल टिकतात तर काही मध्येच तुटतात. अशा परिस्थितीत, बरेचदा लोक पुढे जाऊ शकत नाहीत आणि भूतकाळात अडकून राहतात. त्यामुळे इच्छा नसतानाही ते स्वतःला भावनिकदृष्ट्या कमजोर समजू लागतात. त्याच वेळी, काही लोक असेही आहेत जे पटकन दुसऱ्या नात्यात अडकतात. पण, ही हृदयाची गोष्ट आहे, जी घाईघाईने नाही तर प्रेमाने आणि आपुलकीने परत येते. अशा परिस्थितीत, आम्ही तुम्हाला काही गोष्टींची जाणीव करून देऊ. ज्या सांगतील की तुम्ही ब्रेकअपनंतर अद्याप नातेसंबंधासाठी तयार आहात की नाही...**

- गाडी अजूनही अडकलेली आहे : ब्रेकअपनंतरही तुम्ही तुमच्या एक्सबद्दल विचार करत असाल तर ते चांगले लक्षण नाही. जर तुम्ही एक्सच्या संपर्कात असाल आणि त्याला पुढे जाताना पाहून तुम्हाला हेवा वाटत असेल तर तुम्हाला थोडा वेळ द्यावा लागेल. दुसऱ्या व्यक्तीला संधी देण्याची ही वेळ नक्कीच नाही. कारण तुमची गाडी अजूनही तिथेच अडकलेली आहे.
- स्वतःच्या आयुष्यात व्यस्त रहा : स्वतःला प्राधान्य देणे आणि आपल्या स्वातंत्र्याचा विचार करणे चांगले आहे, परंतु या स्वभावामुळे कोणालाही आपल्या आयुष्यात येऊ न देणे चुकीचे आहे. तुमच्या आयुष्याचा कोणीही भाग बनू नये अशी तुमची भावना आधीपासूनच असेल तर हे स्पष्ट आहे की तुम्ही सध्या तुमचे आयुष्य कोणाशीही शेअर करायला तयार नाही.
- मला वचनबद्धतेची भीती वाटते : काही लोकांना वचनबद्ध होण्यात अडचण वाटते. अशा परिस्थितीत, जर तुम्हीही कमिटमेंटपासून दूर पळत असाल तर हे असं का आहे हे तुम्ही आधी स्वतःला समजून घेणं गरजेचं आहे आणि मगच नात्यात येण्याचा निर्णय घ्यायला हवा.
- इतरांचे विचार महत्त्वाचे वाटतात : जर तुमचा स्वाभिमान इतर लोक तुमच्याबद्दल काय विचार करतात आणि समजून घेतात यावर अवलंबून असेल तर तुमची स्वतःवर प्रेम करण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत तुम्ही स्वतःला समजून घेत नाही तोपर्यंत तुम्ही इतर कोणत्याही नात्याशी पुढे जाऊ शकणार नाही. नात्यातून तुम्हाला काय हवे आहे हे जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून काय हवंय आणि ते कसं असायला हवं हे तुम्हाला माहीत नसेल तर ते तुम्हाला चुकीच्या नात्यात घेऊन जाऊ शकतं.
- तडजोड करायला तयार नाही : नातं मैत्रीचं असो वा प्रेमाचं, ते दोन्ही बाजूंनी जपावं लागतं. हे केले नाही तर नाती तुटतात. अनेक वेळा तुम्हाला तुमच्या जोडीदारासाठी काही गोष्टींबाबत तडजोड करावी लागते, पण तुम्ही हे करू नये असे आधीच ठरवले असेल तर ते भांडणाचे कारण बनू शकते.





## किती खरा, किती खोटा...

### या गोष्टींकडे लक्ष द्या, लगेच कळून जाईल!

**समोरच्या व्यक्तीशी तुमचे नाते खरे आहे असे तुम्हाला वाटते का? तुमचा पार्टनर हे नातं प्रामाणिकपणाने सांभाळतोय की हा सगळा भ्रम आहे? तुमच्याही मनात शंका असेल तर या ५ गोष्टींकडे गुपचूप लक्ष द्या आणि तुमच्या नात्याची परीक्षा घ्या. अनेकदा असे घडते की आपण एखाद्यावर खूप विश्वास ठेवतो आणि नंतर आपल्याला जाणवते की आपण ज्या व्यक्तीवर एवढे प्रेम करतो, त्याचे वेगळेच काहीतरी सुरू आहे. तुम्हीही जोडीदाराच्या बोलण्याने फसत असाल आणि खोटं नातं खरं मानत असाल तर हा लेख खास तुमच्यासाठी आहे... या लेखात आम्ही तुम्हाला अशाच काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत, ज्याकडे लक्ष दिल्यास काही मिनिटांतच नात्याचे संपूर्ण सत्य समोर येईल. मग तुम्ही तुमच्या नात्याची लिटमस टेस्ट घ्यायला तयार आहात का?**


- लोकांसमोर वागणूक पहा : तुमचा जोडीदार तुमच्याशी एकट्यात प्रेमाने आणि आदराने बोलतो. पण बाहेरच्या लोकांसमोर त्याचा अधिकार दाखवण्याचा प्रयत्न करतो. असे असल्यास तो किंवा ती तुमच्याशी बनावट नातेसंबंधात आहे. कोणतेही नाते पुढे नेण्यासाठी आदर सर्वात महत्वाचा असतो. जर तुमचा मित्र, प्रियकर-प्रेयसी, नवरा-बायको किंवा इतर लोक तुमच्याशी प्रेमाने बोलत नसतील आणि तुमचे बोलणे महत्त्वाचे मानत नसतील तर तुमच्याशी नाते ठेवून त्यांना काही फरक पडत नाही. अशा संबंधांमध्ये तुमचा वेळ घालवू नका.
- अतिशयोक्ती करणारे : जे लोक आपल्यावर प्रेम करतात आणि आपल्याला त्यांच्या जीवनाचा एक भाग मानतात ते नेहमी आपल्या चुकांवर प्रकाश टाकतात आणि योग्य ते चुकीचे स्पष्ट करतात. जर तुमचा जोडीदार तुम्हाला जे ऐकायला आवडते त्याबद्दलच तुमच्याशी बोलत असेल किंवा तुम्हाला खूश करण्याचा प्रयत्न करत असेल तर हे तुमच्या नात्यातील प्रामाणिकपणाच्या अभावाचे लक्षण असू शकते. अशा लोकांपासून ताबडतोब अंतर ठेवा.
- मोकळेपणाने बोलणे महत्त्वाचे : कोणत्याही नात्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोलणे आणि फक्त बोलणे नाही तर आपले विचार आणि भावना देखील सामायिक करणे. कुणास ठाऊक, बोलून तुमचं नातं घट्ट होऊ शकतं किंवा असंही होऊ शकतं की बोलून मनातील सर्व कटुता बाहेर पडून नात्याचं वास्तव समोर येईल.
- आरसा वाईट वेळ दाखवतो : जेव्हा तुम्हाला एखाद्याशी तुमचे नाते ओळखायचे असेल तेव्हा ते वाईट मूडमध्ये किंवा रागावलेले असेल तेव्हा प्रतीक्षा करा. कारण रागाच्या भरात एखादी व्यक्ती आपला स्वभाव गमावून बसते आणि अनेक चुकीच्या गोष्टी करतात. पण जर तुमच्याकडे असे लोक असतील जे तुमची प्रत्येक परिस्थितीत काळजी घेतात आणि नात्यात राग आणत नाहीत, तर तुमचे नाते योग्य दिशेने आहे.



## बॉयफ्रेंडनं फसवलं... पुढे काय?

**मी इशिता. वय वर्षे चोवीस. आज इथे माझ्याबाबतीत घडलेला वाईट प्रसंग आणि त्याचा मी केलेला सामना याविषयी बोलणार आहे. माझं एम.कॉम झालं आणि मी एका खासगी कंपनीत कामाला लागले. तिथे माझी ओळख संदीपशी झाली. तो तिथल्या तीन चार कंपन्यांसाठी कॅन्टीन चालवायचा. देखणा, उंचापुरा संदीप, त्याची बोलण्याची स्टाईल आणि एकूण व्यक्तिमत्वाची मला भुरळ पडली. आम्ही कॉफीसाठी, कधी डिनरसाठी बाहेर भेटू लागलो. काही महिन्यांतच आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो. तोपर्यंत घरात माझ्या लग्नाचा विषय सुरू झाला होता. मी घरच्यांना संदीपशी ओळख करून दिली. माझ्या आईबाबांना तो फारसा पसंत पडला नाही. कारण त्याच्या घरच्यांबद्दल त्यानं नीट माहिती दिली नाही. आई-वडिलांना भेटायचं म्हटल्यावर गुळमुळीत उत्तर दिलं. माझे आई-वडील मला स्पष्ट म्हणाले, की त्याच्या घरच्यांची भेट घेतल्याशिवाय ते कुठलंही मत देणार नाहीत...**

संदीप म्हणाला, की दोन आठवड्यात आई-वडिलांना घेऊन येतो, पण काही ना काही कारण काढून तो ती भेट टाळू लागला. फोन नंबर द्यायला देखील टाळाटाळ केली. माझ्या आईनं मला सांगितलं, हे बघ इशिता, हा मुलगा मला योग्य वाटत नाही. तू याचा नाद सोड. पण मी प्रेमात आंधळी झाले होते. दरम्यान, संदीप मला वेगवेगळ्या भेटवस्तू देऊन आणखी छाप पाडू लागला. वडील म्हणाले, आपल्याला सरळ त्याच्या घरी जाऊन नीट चौकशी करावी लागेल. तू कुठलेही चुकीचे पाऊल उचलू नकोस. पुढे मनस्ताप होईल, असं वागू नकोस. मी त्यांचं ऐकायला हवं होतं. नेमकं तिथेच मी चुकले. एक दिवस संदीप म्हणाला, त्याच्या बहिणीचं लग्न ठरलं आहे आणि आई-वडील त्यात बिझी असल्याने आतापर्यंत इथे येऊ शकले नाहीत. तुम्ही प्लीज गैरसमज करून घेऊ नका. मग त्यानं व्हिडीओ कॉल करून पहिल्यांदा माझं बोलणं त्यांच्याशी करून दिलं. ते माझ्याशी खूप छान बोलले. लग्नाला आवर्जून येण्याचा आग्रह केला. मी तर आनंदाने वेडी झाले. मनातील शंका दूर झाल्या. माझा विश्वास जिंकल्यानंतर तो म्हणाला, इशू, आता तू आणि मी काही वेगळे नाही आहोत. माझी एक इच्छा पूर्ण करायला तुझी मदत हवी आहे. असं म्हणून त्यानं बहिणीच्या लग्नासाठी माझ्याकडून पाच लाख रुपये मागितले. प्लीज घरी सांगू नकोस, असंही म्हणाला. माझे आई- वडील माझ्या पगारातून पैसे घेत नसत. त्यांनी ती रक्कम माझ्यासाठीच वेगळी ठेवली होती. मला इतकी भुरळ कशी पडली माहीत नाही आणि मी चक्क त्याला तितके पैसे दिले. त्यानं चेक नको म्हणत दोन टप्प्यात कॅश मागितली. मी तेव्हा तरी सावध व्हायला हवं होतं, पण माहीत नाही कशी काय



चूक करून बसले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मला न सांगता तो गायब झाला. मी वारंवार फोन केले, पण त्याचा फोन बंद होता. मी त्याच्या कॅन्टीनमध्ये गेले. तिथे त्याचा पार्टनर होता. तो म्हणाला, की तीन महिन्यापूर्वीच त्यानं कॅन्टीनची नोकरी सोडली होती. मी पुरती फसवले गेले आहे, हे माझ्या लक्षात आलं. मला आई- वडिलांच्या सावध इशाऱ्याचं महत्व समजलं. मग मला लक्षात आलं की त्यानं अनेक वेळा मला त्याच्या रूमवर रात्री येण्यासाठी किंवा हॉटेलवर एक रात्र मुक्कामी जाण्यासाठी सूचवलं होतं. अनेकदा शारीरिक संबंध ठेवण्याची आडून आडून मागणी केली होती. नशीब मी त्यावेळी भुलले नाही. हे सगळं झाल्यावर मी सरळ आई-बाबांकडे गेले. कारण काहीही झालं तरी शेवटी तेच आपल्याला संकटातून सोडवत असतात. त्यांच्याशी काय असेल ते खरं बोलण्याची गरज असते. बाबा आधी चिडले, पण नंतर मला समजावून घेतलं. आम्ही पोलिसांत तक्रार केली, पण पोलीस म्हणाले, मी त्याला रोख पैसे दिले ही मोठी चूक केली होती. तो सापडेल की नाही माहीत नाही, पण मला मात्र आयुष्य भराचा धडा मिळाला. माझ्या बाबतीत जे घडलं ते तुमच्या बाबतीत घडू नये म्हणून हे सगळं सांगितलं. प्रेमात पडताना तुमचं हृदय काहीही म्हणो, मेंदू सतत सावध ठेवायला हवा मैत्रिणींनो. डोळे झाकून वागलात तर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. जे झालं ते झालं, आता इथून पुढे खूप खूप सावध राहायचं. कुणीही येऱ्यागेऱ्या माणसानं आपला फायदा घेऊन आपल्याला फसवावं इतकं लेचंपेचं मुळीच राहायचं नाही.



### कुणीही येऱ्यागेऱ्यानं आपल्याला फसवावं?

## सूडाशिवाय सोडचिठ्ठी...



**लग्न झाल्यानंतर काही काळाने लक्षात येतं की आपल्या दोघांचं पटत नाहीये. तडजोड करूनही फारसा उपयोग होणार नाहीये. अशावेळी रोज भांडत बसण्यापेक्षा नात्यातून वेगळं होणं केव्हाही चांगलं, परंतु अनेकदा, त्यात त्याला अथवा तिला चांगलाच धडा शिकवेन म्हणत सूडाची भाषा येते. त्याचे परिणाम वाईटच असतात. मतभेद खरोखर संपुष्टात येणार असतील तर दोघं मिळून ते संपवा आणि ते संपवता येणं शक्य नसेल तर दोघांचे मार्ग वेगळे करा...**

आय विल फिनिश हिम ऑफ, आता तर मी त्याला चांगलाच धडा शिकवणार आहे. समजतो कोण हा स्वतःला? स्वतः सर्व चुका करायच्या आणि स्वतःच घटस्फोट हवा म्हणून दावा दाखल करायचा? मी त्याला कधीच घटस्फोट तर देणार नाहीच. पण, त्याला आयुष्यातून उठवेन, माझ्या मुलाचं नखंही त्याच्या नजरेस पडू देणार नाही. तनयला घेऊन जाण्याची भाषा करतो? मी त्याला चांगलाच धडा शिकवेन. त्याला असं मोकळं सोडणार नाही... अवंतिकानं तिच्या हातातील नोटीस बाजूला भिरकावून दिली आणि आपल्या ओंजळीत तोंड लपवून रडत राहिली. तिथंच खेळणारा ७ वर्षांचा छोटा तनय सर्व ऐकत होता. आईला नक्की काय झालंय हे त्याला कळत नव्हतं. तो तिच्याजवळ गेला आणि म्हणाला, आई, तू का रडतेस? काय झालंय? मला कोण घेऊन जाणार आहे? तू रडू नकोस ना. तू रडलीस की मलाही रडू येतं... अवंतिकाने तनयला जवळ घेतलं. आपले डोळे पुसले आणि म्हणाली, बेटा, काही झालं नाही मला, तू रडू नकोस हं, तुला माझ्याकडून कुणीही घेऊन जाणार नाही. शारदाताई लांबून हे सगळं बघत होत्या. तनय खेळायला निघून गेल्यानंतर त्यांनी तिच्याशी बोलायला सुरुवात केली, अवंतिका, अजिंक्यनं घटस्फोट हवा अशी नोटीस तुला पाठवल्यामुळे तू चिडली आहेस ना? पण गेली २ वर्षे तूच तर त्याला सोडून देण्याची भाषा करत होतीस. तुमच्या दोघांमध्ये संशय, गैरसमज, वैचारिक मतभेद झाल्यामुळे तू त्याचं घर सोडून इथं राहायला आलीस. तुमच्या दोघांमधील वाद मिटवेत, तुम्ही पुन्हा एकत्र यावं म्हणून त्याच्या नातेवाईकांनी, मित्रांनी प्रयत्न केले, एवढंच नाही तर तुझ्या बाबांनी आणि मी सुद्धा खूप प्रयत्न केले, पण तुमचे वाद मिटतच नाहीत. तुम्ही दोघं तुमच्या वैयक्तिक मतावर ठाम आहात, मग आता त्यानं घटस्फोटाची नोटीस पाठवली तर तुला एवढा राग का येतोय?

तू असं वागलास, मग मी आता तशीच वागणार, असं म्हणून, लहान मुलं भांडतात तसं तुम्ही दोघेही भांडताय. या सूडबुद्धीच्या पलीकडे जाऊन आयुष्याचा गांभीर्यानं विचार कधी करणार? त्याच्याबद्दल आता मला काहीच वाटत नाही. आमच्यातील प्रेम केव्हाच संपलंय असं तूच म्हणाली होतीस ना? मग आता तुला नक्की कशाचं वाईट

### सूडाचा आनंद?

वाटतंय? कशाचा राग येतोय? त्याला मी चांगलाच धडा शिकवेन, ही सूड बुद्धी कशासाठी? त्यानं तुझ्यावर आरोप केले की, तू त्याच्यावर आरोप करणार. त्यानं एक दावा केला, की तू त्याच्यावर चार दावे दाखल करणार. यामधून काय मिळवणार आहात? सूडाचा आनंद? आणि अशा वातावरणात वाढणाऱ्या त्या कोवळ्या तनयचं काय? तुमच्या वादात त्याचं आयुष्यही कोमेजून जाणार! अवंतिका, अजूनही विचार कर. तुम्ही दोघंही एकमेकांशी बोला. मन मोकळं करा. तुमच्यातील मतभेद खरोखर संपुष्टात येणार असतील तर दोघं मिळून ते संपवा आणि ते संपवता येणं शक्य नसेल तर दोघांचे मार्ग वेगळे करा. उगाचच रस्सीखेच करून, एकमेकांना संपवण्याचा विचार करून खुनशी वृत्तीने वागाल तर दोघंही आयुष्यात कधीच आनंदी होऊ शकणार नाहीत. तुम्ही दोघे जो निर्णय घ्याल त्यावर तनयचं भविष्य ठरणार आहे. कोणताही निर्णय घेताना त्रास होणार, घुसमट होणार पण एकमेकांना उगाचंच त्रास देण्यात स्वतःची मानसिक शक्ती खर्च करू नका... शारदाताई जे सांगत होत्या ते आता अवंतिका शांतपणे ऐकत होती आणि विचार करत होती...

### ...अन् सुडाग्नी शांत!

खरंतर अजिंक्य सोबत राहायचं नाही हे तिनं केव्हांच ठरवलं होतं, आज त्याला सोडण्याचं दुःख नव्हतंच, पण जे मी करायला हवं ते त्यानं का केलं? मग तो जे मागेल ते मी त्याला मिळूच देणार नाही, हा माझाही अहंकार आहे, हे तिच्याही लक्षात येत होतं. ती आईच्या गळ्यात पडून पुन्हा रडू लागली. तिची अवस्था बघून त्या पुन्हा म्हणाल्या, बेटा, लग्न मोडणं आणि आयुष्यभरासाठी जोडलेलं नातं तोडणं वाटतं तितकं सोपं नाही. पण ज्या नात्यातून खरंच मानसिक त्रास होतोय, जे दुरुस्त होणं शक्यच नाही याची खात्री झाली आहे. त्या नात्यापासून लांब राहिलेलं बरं. ते फार ताणत बसू नकोस. सारासार विचार करून निर्णय घे, भांडत बसू नकोस. तू कोणताही निर्णय घेतलास, तरी मी तुझ्या पाठीशी आहे... आईच्या आश्वासक शब्दांनी अवंतिकाला धीर आला आणि तिचा सूडाग्नी शांत झाला.



# कामरगाव येथील १८व्या शतकातील शिलालेख उजेडात

## बारवेच्या कमानीवर देवनागरी भाषेत शिलालेख

कामरगाव : प्रतिनिधी



कामरगाव (ता. नगर) येथील पुरातन बारवेवरील शिलालेख नुकताच उजेडात आला आहे. यामुळे येथील पुरातन ऐतिहासिक ठेवा हाती लागण्याची शक्यता आहे. दिल्लीतील मराठा फौजेचे सेनापती पानिपतवीर अंताजी माणकेश्वर गंधे यांनी बांधलेल्या वाड्याच्या पाठीमागील जमिनीत एक बारव बांधली होती. त्यावर 'उपरोक्त बारव आणि जमीन, रान ही तत्कालीन बाजार भावाने ७ हजार ५०० रुपयांच्या भाडेपट्टीवर आपल्या वंशजांना त्यांच्या संमतीने दिली, असा शिलालेख कोरून ठेवला होता. या शिलालेखाचे नुकतेच वाचन करण्यात आले.

पुणे येथील वीरगळ आणि शिलालेख अभ्यासक अनिल दुधाणे आणि अथर्व पिंगळे यांनी या शिलालेखाचे वाचन करून इथला इतिहास उजेडात आणला आहे. सदरील शिलालेख बारवेच्या कमानीवर शुद्ध देवनागरी मराठी भाषेत आहे. मंगळवार दि. १८ मार्च १७६० रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी हा शिलालेख कोरल्याचा उल्लेख त्यावर आढळतो. स्वत:ची जमीन आणि विहीर भाडेपट्टीवर वंशजांना त्यांच्या संमतीने दिल्याची स्मृती जपणे हा या शिलालेखाचा हेतू आहे. याकामी सतीश सोनवणे, कृष्णा गुडदे, एपिग्राफी म्हैसूरचे अधिकारी आदित्य सिंग रेड्डी, तसेच अंतांजींचे वंशज योगेश्वर गंधे यांचे सहकार्य लाभले.

## शॉर्ट न्यूज

### शहीद सुखदेव यांची जयंती उत्साहात साजरी

**संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय महान क्रांतिकारक शहीद सुखदेव यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने प्राचार्य एच. आर. दिघे सहित उपस्थितांनी शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. जयंती निमित्ताने शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य एच. आर. दिघे यांच्या हस्ते करून अभिवादन लारण्यात आले. प्रसंगी पर्यवेक्षक बी. सी. दिघे, ज्येष्ठ शिक्षक राधाकिसन दिघे, बाबा जगताप उपस्थित होते.



### घरात घुसून महिलेला जबर मारहाण

**नगर :** १२ ते १३ जणांच्या टोळक्याने घरात घुसून दोन महिलांना मारहाण करून घराचा दरवाजा व खिडक्या तोडून नुकसान केले. अल्पवयीन मुलीसोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून तिला शिवीगाळ केल्याची घटना उपनगरात घडली. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात विनयभंग, मारहाण, पोक्सो कलम ानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीर अब्दुल शेख, हर्षल उजगरे, कुनाल उजगरे, आकाश आल्हाट, अक्षय साळवे, दर्शन आल्हाट, रवी आल्हाट व इतर पाच ते सहा अनोळखी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### मागील भांडणाच्या कारणावरून मारहाण

**राहुरी :** ज्ञानेश्वर अशोक झावरे, रा. टाकळीमियाँ, ता. राहुरी. हे दुपारच्या दरम्यान राहुरी शहरातील मेळवणे हॉस्पीटल समोर उभा होते. तेथे रविंद्र राऊत हा आला व मागील भांडणाच्या कारणावरून झावरे यांच्या डोक्यात टनक वस्तुने मारहाण करुन जखमी केले. आणि शिवीगाळ दमदाटी करून परत आम चे नादी लागला तर तुला सोडणार नाही, अशी धमकी दिली. ज्ञानेश्वर अशोक झावरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी रविंद्र राऊत, रा. केंदळ, ता. राहुरी. याच्यावर शिवीगाळ व मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास राहुरी पोलिसांकडून सुरु आहे.



## जरांगे पाटलांनी उपोषण करू नये

### नगरमधील मराठा बांधवांचीमागणी

नगर : प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी ४ जूनपासून पुन्हा एकदा उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, जरांगे पाटलांनी उपोषण करू नये, त्यांची तब्येत ही खालावलेली असून डॉक्टरांनी त्यांना उपोषण करू नये, असा सल्ला दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा आदेश द्यावा, आम्ही त्यांच्या पाठीमागे आहोत, अशी भूमिका नगर येथील मराठा कार्यकर्त्यांनी घेतली आहे. डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांना उपोषण न करण्याचा सल्ला दिला आहे.

एक दिवस देखील उपोषण करू नये, असे डॉक्टरांनी म्हटले आहे. जरांगे पाटीलजी रणनीती ठरवतील, त्याचे मराठा समाज पालन करेल. मनोज जरांगे पाटलांनी त्यांच्या तब्येतीमुळे आंदोलन करू नये, अशी मागणी मराठा बांधवांनी केली.

## १२ जूनपासून मान्सून सक्रिय होणार

### हवामान विभागाचा अंदाज

पुणे : प्रतिनिधी



महाराष्ट्रात यंदा मान्सूनचे आगमन १० ते १२ जूनपर्यंत होण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी होत असून राज्यात १२ जूनपर्यंत मान्सूनच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली.केरळ किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून मान्सूनच्या आगमनासाठी पूरक असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. सध्या स्थिती कायम राहिल्यास नैऋत्य मोसमी पाऊस साधारणपणे १ जूनपर्यंत देशाच्या प्रवेशद्वाराजवळ म्हणजे केरळ राज्याच्या टोकावर हजेरी लावतो. मात्र, सध्या तयार झालेल्या परिस्थितीनुसार तो त्यापूर्वीच म्हणजे २७ ते २८ मे दरम्यान म्हणजे केरळ किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यानंतर दहा ते बारा दिवसांत तो अरबी समुद्रात व तिथून महाराष्ट्रात धडकणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांची सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर,

काथलिय फोन नंबर २३२६८१४
जा.क. पतसंस्था फेडरेशन / ९९६/२४

Email id -ahmednagarfederationgmail.com
दिनांक: २४/०४/२०१४

### स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

नमुना 'झेड' (नियम १०७पोह–नियम (१९(ड–१) पहा.)

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी किसान युनियन ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., पारनेर, ता. पारनेर, जि. अहमदनगर व्याराः अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या, अहमदनगर, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि श्रऋणको माने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे खाली सष्ठी करणा–याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे, त्रऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा–याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१मधील नियम १०७(११(ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. १६/०४/२०२४ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करून ग्रहणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये. आणि व्यवहार केल्यास किसान युनियन ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., पारनेर, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

### स्थावर मालमत्तेचे वर्णन

| अ.क्र | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटिस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे आर चौ. मी. | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार गाडेकर संपत बबन यांची मिळकत व करिता जमिनदार बोरुडे शरद भीमाजी यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४१३७१९/- दि. ३०.०६.२०२२ पासुन १५ टक्के व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. १७.०१.२०२३ जप्ती मो. दि. ०५.०७.२०२३ | पुणेवाडी | २२२६ पैकी | ४.०४ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २ | कर्जदार मिरा प्रशांत औटी करिता जमिनदार – औटी शैलेंद्र संपतराव यांची मिळकत | दावा रक्कम रु. ९३७९९५/- दि. ३०.०६.२०२० पासुन १५ टक्के व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. ११.१०.२०२१ जप्ती मो. दि. १७.०५.२०२१ | पारनेर ता. पारनेर | १९२ ९३पैकी | ०.३० १.१८पैकी | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३ | कर्जदार रोकडे अंकुश चंद्रभान करिता जमिनदार – अंबुले दत्तात्रय राणुजी यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३२०९६७/- दि. ३१.०३.२०२१ पासुन १५ टक्के व्याज + इतर खर्च | मागणी नो. दि. ०५.१०.२०२१ जप्ती नो.दि. २१.०३.२०२२ | पारनेर | २७२ | ०.०७ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ४ | जमिनदार अंबुले संदीप पांडूरंग यांची मिळकत | | | पारनेर ता. पारनेर | ८३ | ०.०१ | | | | |

दि. २४.०४.२०२४
स्थळ : अहमदनगर

शिक्का

सही/–
**बी. पी. पवार, विशेष**
वसुली व विक्री अधिकारी, अहमदनगर, जिल्हा पतसंस्थांची सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर,










'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com

# सविताराणी पुणेकर तमाशाचा मुक्काम

## पारगाव मंगळूरच्या स्मशानभूमीत !; अवकाळी आणि आचारसंहितेचा फडाला फटका

शिरूर : सतीश डोंगरे

अवकाळी पावसाने धास्तावलेल्या सविताराणी पुणेकर या तमाशा मंडळाला मंगळवारी पारगाव-मंगळूरच्या स्मशानभूमीच्या शेडमध्ये मुक्काम करावा लागला.स्मशानभूमीमध्येच रात्री जेवण बनवून तेथेच तमाशा कलावंत निवाऱ्याला थांबले. दुसऱ्या दिवशी दुपारी शिरुर तालुक्यातील जांबूत येथील यात्रेसाठी तमाशा मंडळ रवाना झाले.

लोकसभा निवडणुकीमुळे ग्रामीण भागात होणाऱ्या यात्रा-ऊरुस यांच्यावर निर्बंधाचे सावट आले आहे. त्यामुळे गावागावात होणाऱ्या तमाशाला याचा फटका बसत आहे. कोरोनानंतर नुकसानीत गेलेल्या या कलेला गेल्या वर्षीपासून थोडी मागणी वाढत होती; मात्र यावर्षी निवडणूक आचारसंहितेमुळे तमाशातील कलाकार, मालक यांची आर्थिक पंचायत झाली आहे. अनेक नामवंत फड मालकही यातून सुटले नाहीत.

यात्रा म्हटले, की तमाशा आलाच. मात्र या कार्यक्रमांवर सध्या आचारसंहितेचे सावट आहे. कार्यक्रम नसला तरी तमाशा फड मालकांना दररोज ७०-८० कलावंत सांभाळावेच लागतात. तमाशा कलावंतांना व बिगारी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोजचा भत्ता, चहा, नाश्ता, पाणी, जेवण, आरोग्याच्या सुविधा तसेच पैशांची उचल द्यावीच लागते. पाच-सहा गाड्यांचा डिझेलचा खर्च आहेच. कमाईची कुठलीही शाश्वती नसताना सावकारी कर्ज काढून उभा केलेला हा एवढा मोठा डोलारा घेऊन महाराष्ट्रभर कमाईच्या आशेने हा तमाशा कलावंत फिरतोच आहे. होळी सणानंतर गावोगावच्या यात्रा जत्रा सुरू होतात आणि हाच तमाशा कलावंतांचा कमईचा काळ असतो; परंतु नेमके याच वेळेस सध्या आचारसंहिता लागलेली - असल्याने तमाशा कलावंतांचे आर्थिक भाराने कंबरडे मोडले आहे. स्थानिक




### आमच्या फडावर दहा लाखांचा बोजा !

*राज्यातील तमाशा फडांना कोरोना काळापेक्षाही मोठा फटका यंदा निवडणूक आचारसंहिता आणि अवकाळी पावसाचा बसला आहे, फडमालकांपुढे त्यातून मोठे अर्थिक संकट उभे ठाकले आहे. कार्यक्रम असो नसो कलाकारांना सांभाळावेच लागते अशा परिस्थितीत रोज ७० ते ८० लोकांना सांभाळणे मोठे जिकरीचे काम झाले आहे. आमच्या फडावर कुठलेही सावकारी कर्ज नाही मात्र यांचे जवळपास दहा लाख रुपये कलाकारांचे देणे आहे. आणि आता सीझनही संपत आला आहे. त्यामुळे यातून कसा मार्ग काढायचा या विवंचनेत सध्या आम्ही आहोत.*

***सविताराणी पुणेकर,*** *फड मालकीण तमाशा मंडळ*

पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत, नगरपालिका आचारसंहितेचे कारण सांगून तमाशा - कार्यक्रमाला परवानगी देत नाही आणि दिली तरीही खूप काही अटी नियम घालून दिलेल्या असतात. त्यामुळे यात्रा कमिटी आणि गावकरी ही डोकेदुखी नकोच म्हणून तमाशाचा कार्यक्रमच रद्द करत आहेत त्यातून फड मालकांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

ग्रामीण भागातील अशा कार्यक्रमांना परवानगी द्यावी, अशी मागणी मंगळवारी ( ता. १३) पारगाव मंगरूळच्या स्मशानभूमीत कार्यक्रम नसल्याने मुक्कामी थांबलेल्या कला जीवन पुरस्कार विजेत्या सविताराणी पुणेकर या फडमालकिनीने केली.

ग्रामीण भागातील यात्रा-ऊरुस यामधून भारतीय संस्कृतीचे दर्शन होत असते. अशा यात्रा-ऊरुसामधूनच ही कला जिवंत राहिली आहे. परंतु आता बदलत्या काळानुसार यामध्ये तमाशाशिवाय कलापथक, ऑर्केस्ट्रा, गोंधळ,

वाघ्यामुरळी, कीर्तन, पोवाडे अशाविविध लोककला कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. याचा सर्वाधिक फटका तमाशा कलेला बसला आहे. जानेवारीनंतर साधारण मे अखेरपर्यंत गावागावात यात्रा-ऊरुसाचा हंगाम असतो. यानंतर हे कलाकार बहुतांशी बेरोजगार असतात. त्यामुळे हा हंगाम या सर्वांसाठी खूप महत्वाचा असतो. हंगाम वाया गेला तर संपूर्ण वर्षभर पोट कसे भरायचे? याचा प्रश्न निर्माण होतो. आचारसंहितेच्या कारणामुळे प्रशासन निबंध घालीत आहे. त्यामुळे पुन्हा उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे. असे कार्यक्रम रात्री होत असतात. रात्री १० नंतर निर्बंध असल्यामुळे यावर्षी कार्यक्रमच होऊ शकणार नाहीत, असे प्रशासन सांगत आहे. प्रशासनाच्या कारावाईच्या बडग्यामुळे काही गावातील यात्रा-ऊरुस रद्द केले आहेत. काही गावांनी यात्रा घेण्याचे ठरवले आहे, ते ही कार्यक्रम ठेवायचा की नाही, अशा संभ्रमावस्थेत आहेत. काही गावचे कार्यक्रम रद्द झाले आहेत, तर अनेक गावकऱ्यांनी आचारसंहितेमुळे कार्यक्रम लवकर उरकावे लागत असल्याने तमाशा कार्यक्रमाची सुपारी कमी केली आहे.



# डॉ. संतोष पवार यांना पीएचडी पदवी प्रदान

## पी एच डी मिळविणारे काताळवेढे येथील पाहिले विद्यार्थी

काताळवेढे : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील काटाळवेढे गावचे प्रा. संतोष बारकु पवार यांना नुकतीच सनराईज युनिव्हर्सिटी , राजस्थानची मॅनेजमेंट विभागातील पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

मॅनेजमेंटमध्ये पीएचडी पदवी मिळवणारे ते काटाळवेढे गावातील पहिलेच विद्यार्थी आहेत. त्यांचा मॅनेजमेंटमध्ये संस्थांमधील औदयोगिक संबंधामध्ये मानवी संसाधन विकास सराव पध्दतीवरील कार्यप्रदर्षन मुल्यमापन परिणामांचा प्रायोगिक अभ्यास हा शोधनिबंध होता.

प्रा. डॉ. दयानंद सुरवाडे आढळराव पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, लांडेवाडी, पुणे पीएचडी गाईड यांचे मार्गदर्शन लाभले तसेच डॉ. संतोष पवार हे समर्थ कॅम्पस, बेल्हे येथे कार्यरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल गावचे सरपंच श्री. पियुष गाजरे , सामाजीक कार्यकर्ते श्री. दत्ता भाईक तसेच काटाळवेढे व टाकळी ढोकेश्वर परीसरातील मित्रपरीवाराने त्यांचे कौतुक केले व त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# डॉ.फंड यांच्या टीमला राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार

## कपाशीवरील किड नियंत्रण प्रणालीस तृतीय क्रमांक



**नागपूर येथी केंद्रीय कापूस संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. बाबसाहेब फंड यांच्या टीमला राष्ट्रीय पातळीवरील तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.**

सारोळा आडवाई : प्रतिनिधी

नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. वाय.जी .प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ कीटक शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड यांच्या नेतृत्वाखाली टीमने सादर केलेल्या कपाशीतीलज गुलाबी बोंडआळी आणि रस शोषक कीड नियंत्रण प्रणाली या विषयावरील संशोधनास केंद्रीय स्तरावरील संशोधनास केंद्रीय स्वरावर तृतीय क्रमांकाच्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

कृत्रिम बुध्दीमत्ता आणि फाउव्ह जी कॅमेरा यासारख्या डिजिटल टेक्नॉलॉजी साधनाचा वापर करून हे संशोधन करण्यात आले. केंद्रीय स्तरावर कृषि व किसान कल्याण मंत्रालयाद्वारे आयोजित ऑनलाईन हॅकोथोनमध्ये तृतीय पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

पुरस्कार प्राप्त टीममध्ये डॉ. फंड यांच्या समवेत संगणक तज्ञ प्रशांत गायकवाड, किटकशास्त्र विषयातील विद्यार्थीनी वैष्णवी नानखडे, संचालक डॉ. वाय.जी.प्रसाद यांचा समावेश आहे. प्रशस्तीपत्र आणि एक लाख रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. १५ मे रोजी नवी दिल्ली येथील कृषि भवन येथे कृषि सचिव मनोज आहुजा यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

# पारनेर तालुक्यात वीटभट्टी व्यवसायाला 'अवकाळी' बाधा!

## दरवर्षी होते नुकसान ; शासनाने नुकसान भरपाई द्यावी

पारनेर : गणेश जगदाळे

वीट तयार होण्याच्या सुरुवातीलाच पावसाने अवकृपा केल्यामुळे वीटभट्टी व्यवसाय संकटात सापडला आहे. पारनेर तालुक्यात गेल्या आठवड्यात दुपारी चार नंतर अचानक जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळला. पावसाच्या अवकाळी अवकृपेमुळे वीटभट्टी व्यावसायिकांची मोठी तारांबळ उडाली आहे. तालुक्यात ग्रामीण भागात वीटभट्टी व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. अनेक ठिकाणी वीटभट्टी तयार करण्याचे कामाला सुरुवात होते तर काही भागात भट्टी रचण्याचे काम सुरु होते. परंतु अवकाळी पावसाने मोठा धक्का दिला आणि वीटभट्टी व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान केले.

पारनेर तालुक्यात वीटभट्टी व्यवसाय मोठा आहे. पेट्रोल, डिझेलच्या दरातील वाढ, तुसासाठी २० ते २२ हजारांचा खर्च आता ३५ ते ४० हजारांपर्यंत हजारांपर्यंत वाढला आहे. तसेच एक टन कोळशाच्या खर्च ८ ते ९ हजारांवरून १२ ते १३ हजारांवर गेला आहे. मटेरियलचा खर्च वाढल्याने वीटभट्टी व्यवसाय आतबट्ट्याचा झाल्याचे वीटभट्टी मालक सांगतात. त्यातच आता अवकाळी पावसाने फटका दिल्यामुळे व्यवसाय करायचा की नाही, असा प्रश्न वीटभट्टीमालकांना पडला आहे. बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक बहुतांश विटांचा पुरवठा तालुक्यातूनच होतो. काही लाखांची गुंतवणूक असलेला हा व्यवसाय वीटभट्टीमालक आणि कामगारांना चांगला आर्थिक लाभ मिळवून देतो.



### दरवर्षी नुकसान

*तीन-चार वर्षांपासून अवकाळी पावसामुळे वीटभट्टी मालकांची मेहनत वाया जात आहे. तयार केलेली वीट पावसात भिजत असल्याने दरवषी लाखो रुपयांचे नुकसान होते. असे नुकसान किती वर्षे सहन करायचे, असा सवाल वीटभट्टी व्यावसायिक विचारात आहेत. त्यामुळे सरकारने नुकसानभरपाई करावी नाही तर वीटभट्टी व्यवसाय बंद होईल, असे वीटभट्टी व्यावसायिकांना वाटते.*

### सरकारने भरपाई करावी !

*वीटभट्टी तयार करण्याचा शेवटचा टप्पा हा नफा असतो. परंतु शेवटच्या टप्यात पाऊस पडत असल्याने मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे सरकारने वीटभट्टी व्यावसायिकांना नुकसानभरपाई द्यावी! अशी मागणी पारनेर तालुक्यातील वीटभट्टी व्यावसायिक करत आहेत.*

दरवर्षी ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या हंगामापासून अनेक ठिकाणी वीट व्यावसायिक आदिवासी कामगारांच्या मदतीने विटा पाडायला सुरुवात करतात. एप्रिल, मे महिन्यात उष्णतेची तीव्रता जास्त असल्याने गेल्या वर्षी नोव्हेंबरपासूनच सुरुवात झाली. उशिरा सुरवात झाल्याने वीटभट्टी व्यावसायिकांना पावसाचा फटका बसला.तालुक्यातील बहुतांश वीट व्यावसायिक आदल्या वर्षीच पुढील वर्षाची तयारी करतात. माती जमा करून ठेवतात, मजूर नक्की करून त्यांना आगाऊ रक्कम देतात. या सर्व तयारीत काही लाखांची रक्कम त्यांना गुंतवावी लागते. उन्हाळा वाढल्यानंतर या व्यवसायावर परिणाम होतो. त्यामुळे अनेक व्यावसायिक मार्चपूर्वीच जास्तीत जास्त वीट तयार करून त्या भट्टीत तयार करतात. या वर्षी उशिरा सुरवात केल्याने अनेक भागात वीटभट्टी करण्याचे काम सुरू होते. तर काही भागात कच्ची वीट तयार करून भट्टी लावून देण्याचे काम सुरू होते. परंतु अचानक आलेल्या पावसामुळे अनेक वीटभट्टी व्यावसायिकांनी विटांवर प्लास्टिक टाकले. परंतु सर्वच विटा झाकणे शक्य नसल्याने त्याचा मोठा आर्थिक भुर्दंड वीटभट्टी व्यावसायिकांना बसला आहे.

# नगर येथे महारूद्र महायज्ञ सोहळा

पळवे खुर्द : प्रतिनिधी

केडगांव येथील आद्यस्वामी शिवानंद दादाजी दरबाराच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त भव्य महारूद्र महायज्ञ सोहळयाचे २४ ते २५ मे दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

या महारूद्रयागामुळे अकाल मृत्यूयोगापासून मुक्तता होउन दिर्घ आयुष्याची प्राप्ती होते. भगवान महाकाजलच्या कृपेने काळाचे भय नष्ट होते व नकारात्मक शक्तीपासून मुक्तता मिळते. आजारपण, व्याधी निवारण व गर्भसंस्कारासाठी महारूद्रयाग उपयुक्त ठरते. संसारीक अडचणी, व्यवसायात यश जागेतील दोष, गृहदोष व वास्तूदोष निवरणासाठी महारूद्रयाग उपयुक्त आहे. मातृ-पितृ दोष व जन्मदोष निवारणासाठी उपयुक्त. नव ग्रह दोष, कालसर्प दोष व नारायण नागबळी दोष निवारण, कुलदेवता, ग्रामदेवता व ईष्ट देवता प्रसन्नतेसाठी उपयुक्त, भौतिक जीवन सुखी होण्यासाठी मदत, आपले जीवन ताण-तणाव रहीत व आनंदमय होण्यास मदत होते. यज्ञामुळे



अध्यात्मिक उन्नत्ती, तपोबल व पुण्याची प्राप्ती होते. या हवनामुळे इच्छित संकल्प व फलप्राप्तीसाठी मदत होत असल्याचे सांगण्यात आले.

या यज्ञासाठी पती, पत्नी किंवा एक व्यक्तीही बसू शकते. यज्ञासाठी यजमानांनही गणेश मुर्ती, शिवलिंग, कलश, ताट, ताम्हण, पळी, पेला, तांब्या, बस्कर हे साहित्य आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आयोजकांकडून पुजन साहित्य व हवन सामग्री देण्यात येणार असून सर्व भाविकांना चहा, नास्ता व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. नगरमधील नंदनवन लॉन्स, हॉटेल पॅराडाईज शेजारी, न्यु टिळक रोड येथे या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी या यज्ञामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गुरु मुळेच जीवाला ब्रम्हाची प्राप्ती होते

## ह. भ. प. विकासानंद महाराज मिसाळ ; टाकळी ढोकेश्वर येथे काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

गौळणी बांधती धारणाशी गळा खेळे त्या गोपाळा माजी ब्रम्ह

ह. भ. प. विकासानंद महाराज मिसाळ यांनी या तुकोबारायांच्या काला रुपी प्रकरणातील अभंग घेऊन काल्याच महत्व सांगितले. टाकळी ढोकेश्वर येथील श्री. दत्त मंदिर या ठिकाणी वै. ह भ प योगीराज महाराज गुळवणी, वै. विठ्ठल बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व वै. ह भ प गुरुवर्य बबन महाराज पायमोडे यांच्या प्रेरणेने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार दि. १५ काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी ह. भ. प. विकासानंद महाराज मिसाळ पुढे बोलताना म्हणाले प्रतिपादन केले.

पुढे बोलत असताना मिसाळ महाराज म्हणाले की

भगवंत सर्वत्र आहे सर्वज्ञ आहे सर्व सत्ताधीश आहे पण त्याची प्रचिती जीवाला येत नाही कारण जिवाच्या ठिकाणी असलेल अज्ञान त्याला कारण आहे.

ते अज्ञान जर दूर करायचं असेल तर गुरू जीवनात आले पाहिजे गुरू तो अज्ञानाचा पडदा दूर करतात आणि जीवाला ब्रम्हाची प्राप्ती होते.



असा जीव ब्रम्ह रूपी ऐक्य काला जीवनात प्राप्त व्हावा असे प्रतिपादन ह. भ. प. मिसाळ महाराज यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री. दत्त मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहाचे गेल्या आठ दिवसापासून आयोजन करण्यात आले होते यावेळी ह. भ. प. प्रसाद महाराज खिलारी, ह. भ. प. कविराज महाराज झावरे, ह भ प प्रसाद महाराज वाबळे, ह भ प प्रवीण महाराज गोसावी, ह भ प रविंद्र महाराज पायमोडे, ह भ प आदिनाथ महाराज जुन्नरकर, ह भ प अजित महाराज दिघे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. कृष्णकृपांकित ह भ प विकासानंद महाराज मिसाळ यांची काल्याची किर्तन सेवेने सप्ताहाची सांगता झाली. सप्ताह काळात विविध धार्मिक सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. दत्त भजनी मंडळाने सप्ताह यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# क्लेव्हरीश टेक्नॉलॉजी कंपनीत स्फोट

## सुदैवाना जीवित हानी नाही तालुक्यातील युवा उद्योजकाचे मोठे नुकसान

सुपा : प्रतिनिधी

सुपा औद्योगिक वसाहतीमधील क्लेव्हरीश टेक्नॉलॉजी या एसीसी ब्लॉक तयार करण्याचा कंपनीमध्ये स्फोट होऊन तालुक्यातील युवा उद्योजकाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या दुर्घटनेत जीवित हाणी झाली नाही.

या कंपनीमध्ये पहाटे दिड वाजण्याच्या सुमारस भाजणीचे काम सुरू असतानाचा अचानक स्फोट झाला. स्फोटानंतर कंपनीस आग लागून मोठे नुकसान झाले. आग लागल्यानंतर कंपनीमध्ये उपस्थित असलेल्या तीन कर्मचाऱ्यांनी फायर फायटरच्या मदतीने आग अटोक्यात आणली.

स्फोटानंतर इलेक्टिक पॅनलमध्ये जाळ होऊन त्याचे रूपांतर आगीत झाले. अतितपमानामुळे ॲटो क्लेव्ह यंत्राच्या रबर गॅस्केटच्या एका बाजूला आग लागली. त्यामुळे दरवजाचे प्रेशर एका बाजूने लिक होउन दरवाजा निखळून पडला. निखळलेला दरवाजा इलेक्टिकल पॅनल बोर्डवर पडून लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले. आगीत सुदैवाने कोणतीही जीवित हाणी झाली नाही.

किन्ही येथील युवा उद्योजक प्रज्वल देठे यांनी काही वर्षापूर्वी ही कंपनी सुरू केली असून युवा उद्योजकावर कोसळलेल्या आपत्तीमुळे तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

